# राष्ट्रीय आरोग्य अभियान

# आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियोजन प्रकल्प

# अहमदनगर, रायगड, अमरावती, चंद्रपूर

# राज्य मातृसंस्था

# सोस्वा ट्रेनिंग ॲण्डप्रमोशनइन्स्टिटयुट (स्टापी)

### आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियंत्रण प्रक्रिया उपक्रम (सी.बी.एम.पी.)

*महाराष्ट्रातील जनतेला विशेषत: गरीब/गरजू/ दुर्लक्षित/दुर्बल घटकांना सहज उपलब्ध होतील अशा दर्जेदार आरोग्यसेवा मोफत व विनामूल्य देण्याच्या उद्देशाने सन २००५ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरुवात झाली. आरोग्य समस्या व प्रश्नांना सामोरे जाताना फक्त ठरलेल्या आखून दिलेल्या वाटेवरच न हाता आरोग्य विभागाने निरनिराळ्या नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणजे आरोग्यसेवांवरील लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया.*

*सामाजिकीकरणाद्वारे लोकसहभागास चालना व आरोग्यसेवांचे विकेंद्रित नियोजन हे या अभियानाचे दोन महत्त्वपूर्ण घटक आहेत. या अनुषंगाने आरोग्य सेवांवरील लोकाधारित देखरेख व नियोजन ही आरोग्य यंत्रणेच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने प्रक्रिया अत्यंत महत्वाची ठरली.*

*आरोग्य यंत्रनेमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, त्यांची गुणवत्ता याबाबत लाभार्थ्यांचे मत, विचार काय आहेत हे समजून घेऊन त्या दृष्टीने आरोग्यसेवांमध्ये सुधारणा करणे हा या प्रक्रियेचा गाभा आहे.*

*सन २००८ सालापासून देशातील ९ राज्यामध्ये सुरु झालेली ही प्रक्रिया महाराष्ट्रात आता चांगलीच रुजली व विस्तारली आहे. आरोग्यसेवेत अनेक सकारात्मक बदलही दिसून येत आहेत.*

*लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेची परिणामकारक्ता व उपयुक्ता ह्यामध्ये गावांतील स्थानिक , जनता व सार्वजनिक आरोग्य यंत्रणा (गाव ते राज्य ) ह्यांनी एकत्रितपण काम करणे खूप महत्त्वाचे आहे.*

**आरोग्य यंत्रणेशी संवाद साधूयासरकारी आरोग्य सेवा बळकट करुया !**

***ग्रामसभा /पंचायतीच्या बैठका (मासिक सभा)***

***(मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३६)***

- *प्रत्येक ग्रामपंचायतीची मासिक सभा महिन्यातून एकदा भरेल.*
- *आवश्यकता वाटल्यास पंचायतीची खास सभा बोलावता येईल.*
- *मासिक सभेची नोटीस प्रत्येक ग्रामपंचायत सदस्यास विहित पध्दतीने बजावली पाहिजे व ग्रामपंचायत सूचना फलकावर लावली पाहिजे.*
- *सभेचे अध्यक्ष सरपंच असतील व त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्ष असतील.*
- *पंचायतीच्या सर्व सदस्यांनी नियमितपणे बैठकांना उपस्थित राहून कामकाजात भाग घेतला पाहिजे.*
- *गणपूर्ती पत्रिकेनुसार सभेचे कामकाज चालवावे.*
- *अध्यक्षांच्या परवानगीने विषय पत्रिके व्यतिरिक्त विषयांवर चर्चा करुन निर्णय घेता येईल.*
- *महत्त्वाचे व आर्थिक विषयांचा समावेश विषय पत्रिकेत असावा.*
- *सभा सर्व लोकांसाठी अध्यक्षांच्या परवानगीने खुली ठेवता येईल.*
- *सभेपुढे येणाऱ्या विषयांवर बहुमताने निर्णय घ्यावा.*
- *पंचायतीच्या प्रत्येक सभेचे कामकाज बांधणी केलेल्या पुस्तकात लिहून ठेवले पाहिजे.*
- *सभेच्या कामकाजात अडथळा येईल. असे वर्तन करता कामा नये.*

***दिल्लीत लोकसभा, मुंबईत विधान सभा तशी गावात ग्रामसभा***

- *ग्रामसभा ही गावातील मतदारांची बनलेली असते.*
- *प्रत्येक आर्थिक वर्षात किमान सहा बैठका घेणे बंधनकारक व दोन सभांमध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त अंतर असू नये.*
- *कोरमसाठी १५ % किंवा १०० सदस्यांची उपस्थिती आवश्यक*
- *ग्रामसभेच्या सर्व सदस्यांनी (मतदारांनी) ग्रामसभेच्या कामकाजात भाग घेतला पाहिजे.*
- ***ग्रामसभेपूर्वी महिला सभा घेणे कायद्याने बंधनकारक आहे.***
- *ग्रामसभेच्या कामात अडथळा आणता कामा नये.*
- *ग्रामसभा घेण्याची मूळ जबाबदारी सरपंचाची आहे.*
- *गावातील सर्व शासकीय, निमशासकिय व ग्रामपंचायतीचे कर्मचाऱ्यांनी ग्रामसभेच्या बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक आहे. अनुपस्थित कर्मचाऱ्याचे अनुपस्थितीबद्दल ग्रामसभेने गट विकास अधिकारी यांचेकडे तक्रार केल्यास गट विकास अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही करणे बंधनकारक आहे.*
- *राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या व्यक्तीगत लाभाच्या योजनांकरीता लाभार्थींची निवड करण्याचे अधिकार ग्रामसभेस आहे.*
- *प्रत्येक सहामाहीतून एकदा विकास विषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवणे ग्रामपंचायतीस बंधनकारक आहे.*

*अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीला ग्रामसभांना खास अधिकार आहेत. जसे की अनुसूचित क्षेत्रातील जमिनीच्या बेकायदेशीर संक्रमणास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने ग्रामसभा ग्रामपंचायती मार्फत जिल्हाधिकारी यांना शिफारस करु शकते व सदरची शिफारस जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक आहे.*

*ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होण्यासाठी आरोग्याबाबतचे विषय घेण्याबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : व्हीपीएम-२०१४/ प्र.क्र. ८०/ पंरा-३ दिनांक :-२६ जून,२०१४*

***ग्रामसभा कशासाठी ?***

*ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाही व्यवस्थापनावरील सर्वोच्च यंत्रणा आहे. देशाचा खऱ्या अर्थाने विकास होण्यासाठी ग्रामसभा सर्वात प्रमुख स्त्रोत आहे.*

*गावातील विविध विषय सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे प्रभावी माध्यम ग्रामसभा*

***आरोग्य ग्रामसभा कशासाठी ?***

- *ग्रामीण जनतेचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्यग्राम सभाचे नियमित आयोजन होणे अत्यंत गरजेचे आहे.*
- *जनतेचे आरोग्य विषयक प्रश्न व जनतेला मिळणाऱ्या सुविधाबाबत वेळेवर व शास्त्रोक्त माहिती देणे सोयीचे होण्याच्यादृष्टीने*
- *विविध आरोग्य विषयक कार्यक्रमांची ग्रामीण पातळीवर सखोल चर्चा होण्याकरीता*
- *राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नवनवीन लोकाभिमुख योजनांची माहिती देणे*
- *सार्वजनिक आरोग्य खात्याकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती*
- *आरोग्य सेवांची अंमलबजावणी करण्याची पध्दत लोकांपर्यंत पोहचण्यासाठी*

***आरोग्य ग्रामसभेचा कालावधी***

*२४ एप्रिल ते १ मे (पंचायत राज ते महाराष्ट्र दिन)*

*या ग्रामसभेची उद्दीष्टे*
*१. ग्रामपातळीवरील जनतेस आहार व आरोग्याच्या दृष्टीने विविध योजनांबाबत शास्त्रोक्त माहिती देणे.*
*२. ग्रामपातळीवरील जनतेस विविध आहार व आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रोप्साहित करणे.*
*३. आहार व आरोग्यविषयक योजनांच्या नियोजनांमध्ये जनतेचा सहभाग वाढविणे.*
*४. गावच्या पंचक्रोशितील आरोग्य संस्थांबाबत माहिती देणे.*
*५. आरोग्य संस्थेत उपलब्ध असलेले विविध कार्यक्रम, सेवा व सुविधांबाबत माहिती देणे.*
*६. आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेबाबत माहिती देणे.*
*७. ग्रामपातळीवर पुरविण्यात येणाऱ्या ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अंतर्गत संबंधित निधी वापराबाबत नियोजन करणे.*

*या ग्रामसभेमध्ये आरोग्यविषयक चर्चा करावयाचे विषय*

*१. माता संगोपन व बाल संगोपन*
*२. जननी शिशू सुरक्षा योजना*
*३. नियमित लसीकरण*
*४. ग्राम बालविकास केंद्र*
*५. बाल उपचार केंद्र*
*६. पोषण पुनर्वसन केंद्र*
*७. आजार नियंत्रण प्रकल्प*
*८. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य*
*९. ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती*
*१०.मोबाईल मेडिकल युनिट*
*११.आदिवासी भागांकरीता विशेष योजना*
*१२.रुग्ण कल्याण समिती*
*१३.राष्ट्रीय आरोग्यविषयक कार्यक्रम*
*१४.टोल फ्री दूरध्वनी क्र. १०२,१०४,१०८ बाबत माहिती*
*१५.आशा*

**रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था दिशाकेंद्र संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कडाव प्राथमिक आरोग्य केंद्र - गाव भिवपूरी**

*भिवपुरी गावात पूर्वी ग्रामसभा होत नव्हती. ग्रामसभेमध्ये वाद होत असल्याने ग्रामआरोग्य सभांचे आयोजन नियमित नव्हते. पर्यायाने गावातील व वाडीतले प्रश्न सुटत नव्हते.*

*आरोग्य ग्रामसभा आयोजनाविषयी गावकरी, सरंपच व ग्रामपंचायत सदस्य ह्यांच्याशी चर्चा केली असता एकुदंरच आरोग्य ग्रामसभेविषयीची उदासिनता लक्षात आली. लोकसहभागाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले.*

*आरोग्य सेवांवर लोकाधारित देखरेख व नियंत्रण प्रक्रिया उपक्रमातील कार्यकर्त्यांनी भिवपूरी गावातील ग्रामसभा यशस्वी करण्याच जणू चंगच बांधला.*

*गावातील ग्रामस्थ, सरंपच व सदस्य ग्रामसेवक ह्यांच्याशी एकत्रित नियोजन बैठका घेतल्यानंतर दिनांक १४/५/२०१९ रोजी भिवपुरी ग्रामपंचायतीत आरोग्य ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. ग्रामसभेला ग्रामस्थांची ६० % उपस्थिती. सभा ठिक ११ वाजता सुरुवात झाली.*

*भिवपुरी वाडीतील ग्रामस्थांनी पाणी आरोग्य पोषण आहार संदर्भ सेवा ह्याविषयीच्या चर्चेच्या दरम्यान पिण्याचा पाण्याचा प्रश्न मांडला. बरीच चर्चा झाली. स्थानिकांचा प्रश्न सोडविण्यातील सहभाग लक्षणीय गावातील पिण्याच्या पाण्याच्या तोट्या बराच काळ नादुरुस्त होत्या ग्रामसेवकांनी बैठका इतिवृत्त रजिस्टरमध्ये नोंद घेतली. तोट्यांची दुरुस्ती झाली. आदिवासी वाडा वस्त्यांवर पाण्याची सोय झाली. व पाण्याच्या प्रश्न सुटला.*

***ज्या गावात आरोग्य ग्रामसभा होतच नव्हती, ग्राम आरोग्य सभा नियोजन बद्दल उदासिनता होती, ग्रामस्थांच्या पुढाकाराने त्याच गावाने आरोग्य ग्रामसभेचे यशस्वी आयोजन केले.***

***आरोग्य ग्रामसभेत लोक बोलते झाले. प्रश्न मांडले व ते सुटलेही स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता***

***हे सारे शक्य झाले लोकाधारित प्रक्रिया देखरेख व नियोजन प्रकल्पामुळे***
***लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेमुळे आरोग्य ग्रामसभेतील जनसंघटन मजबूत झाल्याचे आरोग्य ग्रामसभेमध्ये दिसून आले. पाणी व आरोग्य अनुषंगाने पोषण आहार स्वच्छता सांडपाणी व्यवस्थापन शिक्षण ह्या ही विषयावर चर्चा होऊ लागली.***

***रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था दिशाकेंद्र संस्थेच्या कार्यक्षेत्रातील*** *कांदिवडे गावामध्ये ८ मार्च २०१९ रोजी महिला दिनाचे औचित्य साधून आरोग्य सभेचे आयोजन कांदिवडे ग्रामपंचायतीत करण्यात आले. ह्या ग्रामसभेला महिला व पुरुषांचा सहभाग चांगला.*

*गटग्रामपंचायतीतील खरवंडी गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अनेक वर्षापासून सुटला नव्हता.*

*गेल्या ३ वर्षापासून पाण्याच्या प्रश्नाचा पाठपुरावा चालू होता. जनसुनवाई दरम्यानही महिलांनी पाण्याचा प्रश्न मांडला. ८ मार्च २०१९ महिला दिनी आयोजित आरोग्य ग्रामसभेला ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका आशा ए.एन.एम एम.पी.डब्ल्यू ग्राम आरोग्य पाणी पुरवठा कमिटी सदस्य महिला बचत गट सदस्य उपस्थित होते. सर्वांनी पाण्याचा प्रश्न उचलून धरला.*

*दिनांक ९ मार्च २०१९ रोजी ग्रामपंचायत सदस्य, ग्राम आरोग्य पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती सदस्य, महिला बचत गट ह्यांनी खरवंडी गावात जाऊन बोअर रिपेअरिंग करुन घेतले. गावचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला महिला आता खूप समाधानी आहेत.*

*रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खांडस गाव ११ वाड्या वस्त्यांवर विस्तारलेले. गावात*



***' अन्न, पाणी आणि फळे झाकून ठेवू, रोगराई, जंतूंचा प्रादुर्भाव दूर ठेव'***

*पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट . पाण्यासाठी लोकांची रोजची वणवण*

*खांडस गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरीय जनसंवादाचा परिणाम म्हणून ११ वाडी वस्तीवरील आदिवासी बांधवांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नाचा ठराव मंजूर झाला.*

*दिनांक २२.५.२०१९ रोजीच्या आरोग्य ग्रामसभेमध्ये हा मुद्दा वाडीतील लोकांनी पुन्हा मांडला. सरपंच व ग्रामसेवक ह्यांनी ह्या वाडीतील लोकांना टँकरने पाणी पुरवण्याविषयीचा ठराव त्याच दिवसी ग्राम सभेमध्ये मांडून व मंजूर करुन घेतला आणि पाण्याचा प्रश्न सुटला.*

***लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प अंतर्गत खांडस गावात आयोजित विविध उपक्रमांचा आरोग्य ग्रामसभेतील लोकसहभाग व जनसंघटन मजबूत होण्यासाठी झाल्याचे आरोग्य ग्रामसभेमध्ये स्पष्ट दिसून आले. ६०% ग्रामस्थांची उपस्थिती ह्या आरोग्य ग्रामसभेस होती.***
***मंचकार वाडी, धाबेवाडी, बागांरवाडी, ह्या वाड्याचे पाण्याचे प्रश्न आता सुटले आहेत. ह्या गावातून टँकरने पाणी पुरवठा होत आहे. पाण्याबरोबरच आरोग्य शिक्षण पोषण व आहार हया प्रश्नावर चर्चा होऊ लागली आहे.***

***रायगड जिल्ह्यातील सुधागड/पाली तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था प्रवास फाउंडेशन संस्थेच्या कार्यक्षेत्रातील नांदगावात*** *दि. ३ मे २०१९ रोजी आरोग्यविषयक ग्रामसभा पार पडली. ह्या आरोग्य ग्रामसभेत सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांची नियमित उपलब्धता, नांदगाव उपकेंद्रास प्राथमिक आरोग्य केंद्र मान्यता व मंजूरी , विंचू व सर्प दंशाच्या प्रतिबंध लसीची गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्धता, तसेच सुधागडपाली येथे स्त्री व बालरोग तज्ञांची उपलब्धता ह्या विविध विषयांवर ग्रामस्थांनी चर्चा केली.*

*आरोग्य ग्रामसभा म्हणजे हमीच्या आरोग्य सेवाबद्दल व्यक्त व्हायचे एक प्रभावी व्यासपीठ*

***अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था लोकपंचायत संस्थेच्या कार्यक्षेत्रातील*** *पिंपळगावदेवा हे गाव प्राथमिक आरोग्य केंद्र चंदनापूरी पासून १५ कि.मी. वर वसलेले आहे.*
*दिनांक १३/५/२०१९ रोजीच्या ग्राम आरोग्य सभेस ग्रामसेवक प्राथमिक आरोग्य देखरेख समिती सदस्य, उपसरपंच, पंचायत समिती सदस्य, अंगणवाडी सेविका, आशाताई, आशा गटप्रवर्तक ताई, बचत गटाच्या महिला सभासद, सामाजिक कार्याला वाहिलेला तरुण श्री. सागर गांजवे ह्या सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.*

*ह्याच ग्रामसभेत* ***ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा स्वच्छता समितीचा निधी आरोग्याच्या विविध उपक्रम/ गरजांसाठी येतो,*** *हे समजल्यावर महिला बोलत्या झाल्या. महिलांनी महिलांच्या आजार तपासणीविषयी बद्दलचे (छातीत गाठी, पाळी वेळेवर न येणे पिशवीचे आजार ) आपले मुद्दे ह्यासभेत सर्वांसमोर मांडले व समिती सदस्यांच्या मदतीने आरोग्य प्रश्नांवर एकत्र काम करण्याचे ठरले.*

*लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प अंतर्गत दिनांक १३/५/२०१९ रोजीची आरोग्य ग्रामसभा घडवून आणण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र देखरेख समितीचे सदस्य व गावचे उपसरपंच मा. डॉ. गुंड याचा विशेष सहभाग मिळाला त्यांनी सरपंच, ग्रामसेवक ह्यांना लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प ही प्रक्रिया ठोसपणे समजावली.*

***अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था लोकपंचायत संस्थेच्या कार्यक्षेत्रातील भोजदरी हे*** *गाव बोटा प्राथमिक आरोग्य केंद्रापासून १५ कि.मी. वर वसलेले आहे.*

*दिनांक ६/५/२०१९ रोजीच्या ग्राम आरोग्य सभेस गावच्या सरपंचाचे विशेष सहकार्य लाभले.*
*ह्या ग्राम आरोग्य सभेमध्ये आरोग्याच्या योजना लोकांना समजल्या. मातृवंदना योजनेअंतर्गत*

लाभार्थ्यांची यादी आरोग्य ग्रामसभेत वाचल्यामुळे ज्यांना लाभ हवा आहे, त्यांनी आवश्यक कागदपत्रे पूर्ण करुन देणे ही वैयक्तिक जबाबदारी कळाल्यामुळे, लोक आणि अधिकारी यांच्यातील समन्वय वाढला आणि ग्रामस्थ आणि गावकरी ह्यांच्यातील समस्या आहे हे लोकांना समजले.
गाळ युक्त शिवार, गाळ मुक्त धरण अशा अभियानातून गाव पाणीदार करण्याचा प्रयत्न गावाने एकत्रित येवून केला.

लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्पांतर्गत विकेंद्रीत आरोग्य नियोजन प्रक्रिया भोजदरी गावात झाल्यामुळे तळ्यापासून ते मळ्यापर्यंत सर्व प्रक्रियेत ग्रामस्थाचा सहभाग चांगला
तालुका पातळीवरील बैठकांनाही ग्रामस्थांची नियमित उपस्थिती

**अहमदनगर जिल्ह्यातील अहमदनगर तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था सी.एस.आर.डी. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वाळकी प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत - राळेगण म्हसोबा गावाच्या आरोग्य ग्रामसभेत**
उपकेंद्र स्वच्छता व आरोग्याच्या विविध प्रश्नावर चर्चा झाली.

दिनांक ४.६.२०१९ रोजीच्या ग्रामसभेत राळगण म्हसोबा गावातील ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न

मांडला. ह्या ग्रामसभेला गावातील सर्व ग्रामस्थ सरपंच, ग्रामपंचायत सदस्य शिक्षक वर्ग व गावातील अनेक शासकीय कर्मचारी ह्यांनी आरोग्य हजेरी लावली.

कित्येक महिने पाणीपुरवठा या प्रश्नांला समाधानकारक उत्तर मिळत नव्हते. बऱ्याच महिन्यापासून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न न सुटल्याने सर्वच जण संतापलेले.

सर्व ग्रामस्थांनी ह्या प्रश्नावर शांततेने चर्चा करण्याचे ठरवले. ग्रामसेवकांनी पाणी पुरवठ्यासाठी लागेल ती मदत करण्याचे आश्वासित केले. ग्रामस्थांनीही श्रमदानाची तयारी दाखविली.

दिनांक ५/६/२०१९ रोजी म्हणजेच आरोग्य ग्रामसभेच्या दुसऱ्या दिवशी जे.सी.बी. च्या मदतीने व रोजगार हमी अंतर्गत गावात चारी खड्डे सुरु केले आणि त्यामध्ये पाईप लाईन उपलब्ध करुन पिण्यायोग्य पाणी मिळण्यासाठी गावातील घरासमोरच नव्हे तर शेतामधून, डोंगराच्या कडेने खड्डे करुन पाईपलाईन तयार केली.

लोकाधारित देखरेख नियोजन प्रक्रियेमुळे कित्येक ग्रामसभातून सुटला न गेलेला हा पिण्याचा पाण्याचा प्रश्न प्रभावीपणे सुटला. गावातील आशा स्वयंसेविका आणि सी.बी.एम.पी.चे कार्येकर्ते ह्यांच्या एकत्रित पुढाकारामुळे पाण्याचा प्रश्न सुटला.

**अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था डिव्होटेड ऑगनायझेशन संस्थेच्या कार्यक्षेत्रातील उपकेंद्र काकडा अंतर्गत काकडा गावातील** दिनांक १६.६.२०१९ रोजीच्या आरोग्य ग्रामसभेमध्ये पाच हजार लोकवस्तीच्या काकडा गावातील उपकेद्रस्थित आरोग्य सहाय्यक आणि ए.एन.एम. ह्यांची कायमस्वरुपी निवासी पद नियुक्ती प्रक्रियेस गती देणे आवश्यक हा मुद्दा चर्चेस आला.

ह्या आरोग्य ग्रामसभेत एक कायमस्वरुपी निवासी ए.एन.एम. नियुक्ती बाबत ग्रामसभेचा ठराव आला व त्यासंबधिचे लेखी पत्र वैद्यकीय अधिकारी काकडा उपकेंद्र व तालुका अधिकारी अचलपूर ह्यांना देण्यात आले. करण्यावर एकत्र झाले व तसा ठराव ग्रामसभेत मंजूर झाला.

गावातील लोकांनी स्वत:च्या घरासमोरील कचऱ्यांचे ढिगारे उचलण्याचे व परिसर स्वच्छतेबाबत चर्चा केली डेंग्यूसारख्या आजारावर न्यूऑनची नियमित फवारणी १४ वित्त आयोगातून नियमित व्हावी असे लोकांना सुचविले.

***अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था डिव्होटेड ऑगनायझेशन संस्थेच्या कार्यक्षेत्रातील येसूर्णा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत निबांरीगावात*** *दिनांक २९/५/२०१९ रोजी सरपंच यांच्या अध्यक्षते खाली आरोग्य ग्रामसभा संपन्न झाली. ग्रामआरोग्य संदर्भातील शासन निर्णयांचे वाचन झाल्यानंतर गावातील वाढलेल्या साथीच्या आजाराच्या प्रमाणाबद्दल चर्चा झाली. गावातील पाण्याचे नमुने नियमित तपासले जावेत अशी मागणी ग्रामस्थांनी केली. ह्याच आरोग्य ग्रामसभेत ग्रामीण पाणीपुरवठा ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा स्वच्छता समिती सचिवानी एम.पी.ड्ब्ल्यू. तत्काळ लेखी व तोंडी संपर्क साधला. दिनांक २/६/२०१९ रोजी एम.पी.ड्ब्ल्यू नी गावात पाणी तपासणीची कार्यवाही केली व गावात आर.ओ. युनिट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. ह्या ग्रामसभेत गावातील आशाताईकडे पुरेसा औषधीसाठा उपलब्धीबद्दल ही चर्चा झाली.*

*लोकाधारित देखरेख नियोजन प्रक्रियेमुळे गावात फवारणी, नाली सफाई, घनकचरा व्यवस्थापन ह्या मुद्द्यांबाबत सर्व ग्रामस्थांनी एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला. ग्रामआरोग्य सभेमुळे गावात आरोग्याच्या विविध प्रश्नावर जनजागृती व चर्चा झाली. आरोग्यसंबधित काही मुद्दे मार्गी लागले.१४ वित्त आयोगामधून निधी प्राप्त होताच आरोग्याचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्याचे ठरले.*

***अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील तालुका सहभागीय संस्था अपेक्षा होमिओ सोसायटी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील चांदूर रेल्वे येथे लोकाअधारित*** *प्रक्रियाच्या व्यतिरिक्त लोकसहभागीय ग्राम आरोग्य ग्रामसभा अयोजन करण्यात मा. गटविकास अधिकारी ह्यांनी पुढाकार घेतला. सुरवातीलाच तालुका पातळीवर ग्रामसेवकांची बैठक घेऊन त्यांनी आरोग्य ग्रामसभाची माहिती व आयोजनबद्दलच्या सूचना केल्या. गावातील सरपंच आणि व्ही.एच.एस.एन.सी. समिती सदस्यांना ग्रामसभेविषयी अवगत करण्यात आले.*

*दिनांक १४/६/२०१९ च्या चांदूर रेल्वे तालुक्यातील आरोग्य ग्रामसभेत आलेले महत्वाचे मुद्दे :*

1. *गामसभाचे नियमित आयोजन*
2. *१४ वित्त आयोग मधून उपकेंद्र, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रांना या निधीमधून मदत उदा. पाणी व्यवस्थापन स्वच्छता, नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजन*
3. *गावात कमी वजनाच्या मुलांच्या आरोग्याबाबत आढावा*
4. *अंगणवाडी मधील आहार दर्जा सुधारणे - अंगणवाडी मध्ये मुलांचे वजन घेत पालकांची उपस्थिती महत्वाची*
5. *आरोग्य सेविकाच्या नियमित भेटी, आरोग्य पोषण दिनी ग्राम आरोग्य पोषण व पाणीपुरवठा आरोग्य व स्वच्छता व समितीचा सहभाग*
6. *ग्राम आरोग्य पोषण समितीचा अबंधित निधीचा नियमित विनीयोग*
7. *शासकीय योजना विधवा पेन्शन योजना, सामाजिक सुरक्षा योजना रोजगार, शिक्षण*
8. *शाळा व्यवस्थापन समिती - रिक्त पदे इत्यादी.*
9. *स्वस्त धान्य दुकानामध्ये नियमित दुकान उघडे असावे.*

# लोकाधारित देखरेख व नियोजन प्रक्रिया प्रकल्प सार्वजनिक आरोग्य संदर्भातील दिन विशेष

| | |
|---|---|
| २१ जुन | जागतिक योगा दिन |
| २७ जुन | हेलन केलर दिन / शारीरिक वैगुण्य दिन |
| ११ जुलै | विश्व लोकसंख्या दिन वाढती लोकसंख्या, बालिका भ्रुणहत्या थांबवून बेटी वाचवा असा संदेश या दिनाचे औचित्य साधून देता येईल. |
| २६ जुलै | हा राजर्षी शाहुमहाराज जंयती समता/ सामाजिक न्याय दिन औचित्य साधून साजरा समावेश महिलांना समान वागणूक देण्यासाठी प्रयास करण्याचा दिवस. |
| २९ जुलै | ओआरएस (ओरलरी हायड्रेशन सॉल्ट/सोल्युशन दिवस) |
| १ ऑगस्ट | जागतिक स्तनपान दिन |
| ८ ऑगस्ट | जागतिक हृदय प्रत्यारोपण दिन |
| १५ ऑगस्ट | गर्भ नाळ बँक दिन |
| ११ सप्टेंबर | जागतिक प्रथमोपचार दिवस |
| २३ सप्टेंबर | कन्या अपत्य दिन |
| २५ सप्टेंबर | जागतिक फार्मसिस्ट दिन |
| १ ऑक्टोबर | जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन |
| १० ऑक्टोबर | जागतिक मानसिक आरोग्य दिन |
| १५ ऑक्टोबर | जागतिक ग्रामीण महिला दिन |
| १८ ऑक्टोबर | जागतिक रजोनिवृत्ती दिन स्त्रियांच्या आयुष्यातील एक परिवर्तनांचा काळ |
| २१ ऑक्टोबर | आंतराष्ट्रीय आयोडिन कमतरता जन्मजात प्रतिबंधक दिन |
| २४ ऑक्टोबर | जागतिक पोलिओ दिन |
| ७ नोव्हेंबर | जागतिक कर्करोग जागृती दिन |
| १० नोव्हेंबर | विश्व लसीकरण दिन |
| १४ नोव्हेंबर | जागतिक मधुमेह दिन |
| १४ नोव्हेंबर | बाल दिन |
| १५ नोव्हेंबर | राष्ट्रीय हत्तीरोग दिन |
| २५ नोव्हेंबर | स्त्रियांवरील अत्याचार हटवण्याचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा |
| १ डिसेंबर | जागतिक एड्स दिन |
| ३ डिसेंबर | जागतिक विकलांग दिन |